महाराष्ट्र शासन
राष्ट्रीय आरोग्य अभियान
**राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, महाराष्ट्र**

**कार्यकारी संचालक**
कार्यालय दुरध्वनी
क्र. ०२०-२६०५७५०१/१०
Email ID - shsrc.gom@gmail.com
**Reg. No. : Pune/ 0001639/2024**

राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद, औंध जिल्हा रुग्णालय परिसर, सांगवी फाटयाजवळ, औंध छावणी, औंध, पुणे - ४११०२७

राआयंसंके/ TDS कामकाज दरत्रके/ /२०२६
दिनांक २८/०४ /२०२६ ५६३

प्रति,

-------------------------------

-------------------------------

विषय - या कार्यालयातील कपात करण्यात आलेल्या टिडीएस संबंधित कामकाजासाठी दरपत्रके मागविणेबाबत.
संदर्भ - मा.कार्यकारी संचालक, SHSRC यांची मंजूर ईनस्ती दि.२०/०४/२०२६

राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र पुणे या कार्यालयातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे मानधनातून व एजन्सीधारकाचे देयकातून आयकर विभागाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कर (टिडीएस) रक्कम कपात करण्यात येते.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये कपात केलेली रक्कम प्रत्येक तिमाहीस ई-प्रणालीव्दारे आयकर विभागास भरण्याकरीता वार्षिक करार तत्वावर लेखापरिक्षक नियुक्त करण्यात येत असून या पत्राव्दारे सदर कामकाजासाठी दरपत्रक मागविण्यासाठी नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

यानुसार आपण सदर काम करण्यास इच्छुक असल्यास आपले दरपत्रक भरुन या कार्यालयास ही नोटीस(सुचना) संकेतस्थळावर प्रसिध्द झालेपासून दि. 06/05/२०२६ पर्यंत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने पाठवावेत. याबाबत काही चौकशी करावयाची असल्यास या कार्यालयाचे दुरध्वनीवर (०२०-२६०५७५०१ / ५१०) संपर्क साधावा.

या कार्यालयास उशिराने प्राप्त होणारे आणि अपुर्ण अथवा खाडाखोड केलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही तसेच संबंधित कामकाजाबाबत अंतीम निर्णय घेण्याचे अधिकार सर्वस्वी मा. कार्यकारी संचालक यांचे रहातील याची नोंद घ्यावी.

**कार्यकारी संचालक**
**राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र पुणे**